अभियांत्रिकी महाविद्यालय
शिवाजीनगर पुणे ५
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था, पुणे ५)
दूरध्वनी क्र. २५५०७३१० फॅक्स नं. ०२०२५५०७२९९

दिनांक- १८/०९/२०१७

# राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती सूचना नूतनीकरण

## (फक्त अनुसूचित जतीच्या विद्यार्थ्यांसाठी )

ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये **राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती** मंजूर झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती पुढे चालू राहण्याकरीता विहित नमुन्यातील अर्ज व खालीलप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे जोडून दि. **२५/०९/२०१७.** पर्यत लेखा विभागात सादर करावेत. अर्जा सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.

१. विहित नमुन्यातील अर्ज (विद्यार्थी भंडारमध्ये उपलब्ध आहे )

२. खर्चाचे प्रमाणपत्र (Expenditure Certificate)

३. बॅंक पासबुक (झेरॉक्स प्रत )

४. एक रुपयाचे दोन रेव्हेन्यू स्टॅंप

५. मागील वर्षाची गुणपत्रिका ( झेरॉक्स प्रत )

६. आधार कार्ड (झेरॉक्स प्रत )

७. 2 Student Undertaking Form ( विद्यार्थी भंडारमध्ये उपलब्ध आहे )

तसेच राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती/फ्रिशिप व विद्या वेतन योजनेसाठी अर्ज करु नयेत. ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एखाद्या विद्यार्थ्यास भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच विद्या वेतन योजनेची रक्कम मिळाली असेल तर ती परत लेखा विभागात दिनांक २५.०९.२०१७ पूर्वी जमा करावी. राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या एखाद्या विद्यार्थ्यास भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच विद्या वेतन योजनेची रक्कम मिळाली असेल व सदर विद्यार्थ्यांने वरील दिलेल्या मुदतीत परत केली नाही तर शासनाच्या नियमाप्रमाणे आपण दोन शिष्यवृत्तीचा फायदा घेतला आहे असे समजण्यात येईल व सदर विद्यार्थ्याची राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

अर्ज भरत असताना विद्यार्थाने अर्जतील महिती अपूर्ण व चुकीची भरल्यास अर्ज रद्द करण्यात येईल व शिष्यवृत्ती न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विद्यार्थाची राहिल नोंद घ्यावी.

शिष्यवृत्तीचा अर्ज लेखाविभागात सादर केल्यानंतर संबधित विद्यार्थ्यांनी अर्जाची पोच पावती (Acknowledgement Receipt) लेखा विभागातून घ्यावी. तसेच पोच पावती शिष्यवृत्तीची रक्कम मिळेपर्यंत संभाळून ठेवावी. पोच पावतीशिवाय कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही. पोच पावती हरविल्यास आपण शिष्यवृत्तीचा अर्ज भरला नाही असे समजण्यात येईल.

संचालक
अभियांत्रिकी महाविद्यालय,
पुणे-५

COLLEGE OF ENGINEERING PUNE